नि.फौ.ख.क्र. ३९/२०१९
(नि.१२)

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव –उदय विठ्ठल परब

वय सुमारे –५७ वर्षे, व्यवसाय–शेती

निवासस्थान–आजगाव, ता.सावंतवाडी, जिल्हा– सिंधुदुर्ग.

**सरतपास सहायक सरकारी वकील श्री.ए.व्ही.पेडणेकर यांच्यामार्फत सुरु–**

दिनांक ०७/०९/२०१८ रोजी मी पोलिसांसोबत पंचनामा करण्यासाठी कोठेही गेलो नव्हतो. माझ्यासमक्ष पोलीसांनी एक बंदूक जप्त केली व तिचा पंचनामा केला असे काही घडले नाही. मी शिरोडा पोलीस दूरक्षेत्र येथे सही केली होती, पोलिसांनी एका कागदावर माझी पोलीस ठाणेत सही घेतली. त्यात काय लिहीले होते, हे मला माहिती नाही. (साक्षीदाराला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला.) त्यावर अनु.क्र. २ वरील सही माझी आहे. पंचनाम्यामधील मजकूर मला माहीत नाही. सहीस **नि. १३** दिले.

**सदर साक्षीदार सरकारी पक्षास सहाय्य करीत नसलेने त्यास सरकारी वकीलांनी उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली ती त्यांना देण्यात आली.**

०२. हे म्हणणे खरे नाही की दि. ०७/०९/२०१८ रोजी पोलीस कॉन्स्टेबल भिसे यांनी मला सांगितले की, आजगाव भोम, खालची ख्रिश्चनवाडी, घर क्र. ४४३ येथे जॉन पेदरु फर्नांडिस यांच्याकडे विनापरवाना सिंगल बॅरेल ठासणीची बंदूक असल्याची त्यांना विश्वसनीय माहिती मिळाली आहे व त्याच्या राहत्या घरी जावून छापा टाकून ती बंदूक जप्त करावयाची आहे . हे म्हणणे खरे नाही की मी व दुसरे पंच घटनास्थळी गेलो व आमच्यासमक्ष पोलीसांनी आरोपीकडे सिंगल बॅरेल ठासणीच्या बंदूकीबाबत चौकशी केली. हे म्हणणे खरे नाही की मी व दुसरे पंच आमच्यासमक्ष आरोपीने त्याच्या घरातील लोटाच्या उजव्या बाजूकडे सामानाच्या खोलीतून एक सिंगल बॅरेल ठासणी बंदुक पोलीसांकडे हजर केली. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने सदर बंदुक ही त्याच्याकडे १५ वर्षापासून असल्याचे व त्याचा परवाना त्याच्याकडे नसल्याचे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी आम्हा पंचांसमक्ष रक्कम रुपये १०,०००/– किंमतीची सिंगल

बॅरेल ठासणीची लाकडी दस्ता असलेली सुमारे ४.६ फूट लांबीची बंदुक आमच्यासमक्ष जप्त केली, त्याचा जप्ती पंचनामा केला व मी त्यावर वाचून, पाहून सही केली. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला ओळखतो, त्याला वाचविण्यासाठी आज मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.बी.एन.प्रभू यांचेमार्फत नाकारला.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–

दिनांक– १७/०८/२०२२

(के.के.पाटील)

न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.